# नियमित दिवाणी दावा क्रमांक १८९/२०२५ मधील नि.क्र. २६ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र. ४ ते ७ ने त्यांचेविरुध्द कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिला आहे. प्रतिवादी यांचे म्हणण्यानुसार, वादी व प्रतिवादी यांचेमध्ये तडजोडीची बोलणी चालू होती. त्याप्रमाणे वादी यांनी प्रस्तुतचा दावा तडजोडीप्रमाणे काढून घेणेचे ठरले होते. परंतु, वादी यांनी तडजोडीप्रमाणे दावा काढून घेतला नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द विना कैफियत सुनावणी आदेश पारित झाला आहे. प्रतिवादीविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होऊन कैफियत देण्याची संधी मिळणेचे गरजेचे व आवश्यक आहे. तरी, प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होऊन लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

२. प्रस्तुतचे अर्जास वादीने निशाणी क्र. २९ वर म्हणणे सादर करुन हरकत नोंदविण्यात आली. वादीचे म्हणण्यानुसार, प्रतिवादीच्या अर्जातील मजकूर चुकीचा आहे. अर्जात दिलेले कारण योग्य नाही. निशाणी ५ चा अर्ज लांबवण्यासाठी मुद्दामहून प्रतिवादीने उशीरा अर्ज दिला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदाराचे कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी मागणी प्रमाणे परवानगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर ताकीद व हुकुमात्क ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादमुद्दा गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादींची लेखी कैफियत अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने संयुक्तिक आहे. परंतु प्रतिवादींविरुध्द निशाणी क्र. १ वर विना कैफियत आदेश झाल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादींवर खर्च बसवून संधी देणे योग्य राहिल. सबब मुद्दा नं.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज रक्कम रुपये ३००/- प्रतिवादी क्र. ४ ते ७ ने वादीस खर्च म्हणुन देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात आलेला नसल्याने त्याबाबत आदेश नाही.

VAIBHAV BAJRANG GHADAGE

Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.07.24 12:46:01 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- २३.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.